# पश्चिम विभागीय परिषदेस प्रारंभ

**औरंगाबाद, (लोकमत ब्युरो)-** उद्योग आणि लेखा व्यावसायिकांनी एकत्र काम केले पाहिजे. भारतीय अर्थव्यवस्थेचीही हीच अपेक्षा आहे, असे मत वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष आर.एन. बागला यांनी व्यक्त केले. औरंगाबादेत इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंटस् ऑफ इंडिया (आय.सी.डब्ल्यू.ए.) च्या दोन दिवसीय पश्चिम विभागीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

आय.सी.डब्ल्यू.ए. च्या औरंगाबाद शाखेने आयोजित केलेल्या या परिषदेत 'अप्रत्यक्ष कर नियोजन' हा विषय आहे. प्रारंभी आय.सी.डब्ल्यू.ए. च्या औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष रामानंद मोदानी यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी पश्चिम विभाग परिषदेचे अध्यक्ष धनंजय जोशी यांचेही भाषण झाले. चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष मुकुंद भोगले यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत येत असलेल्या बदलांची माहिती दिली. ते म्हणाले की, 'कॉस्ट अकाऊंटिंग'ची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. यावेळी आय.सी.डब्ल्यू.ए. चे राष्ट्रीय उपाध्यक्ष के.एल. जयसिंग प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. स्थानिक शाखेचे सचिव नितीन शर्मा यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. रमेश जोशी यांनी आभार मानले.



**आय.सी.डब्ल्यू.ए. च्या पश्चिम विभागीय परिषदेला औरंगाबादेत शुक्रवारी सुरुवात झाली. उद्घाटनप्रसंगी दीप प्रज्वलन करताना सी.एम.आय.ए. चे अध्यक्ष मुकुंद भोगले. समवेत आर.एन. बागला, आर.जी. मोदानी, डी.व्ही. जोशी आणि व्ही.व्ही. देवधर.**

# भारतीय उद्योगांतील सर्वच घटकांवर मोठी जबाबदारी

## आर. एन. बागला यांचे प्रतिपादन

औरंगाबाद, ता. २२ : जागतिकीकरणाच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी भारतीय उद्योगक्षेत्रातील सर्वच घटकांवर मोठी जबाबदारी आली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योगपती आर. एन. बागला यांनी शुक्रवारी (ता.२२) येथे केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स, अकाऊंटट्स ऑफ इंडियाच्या (आयसीडब्ल्यू एआय) औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित पश्चिम विभागीय अधिवेशनास आजपासून (ता.२२) शहरात सुरवात झाली. त्याचे उद्घाटन श्री. बागला यांच्या हस्ते झाले, या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला औरंगाबाद शाखेचे सचिव नितीन शर्मा, वेस्टर्न इंडिया रिजन चॅप्टरचे (डब्ल्यूआरआयसी) सचिव रमेश जोशी, आर. जी. मोदाणी, निर्लेप उद्योगसमूहाचे व्यवस्थापकीय संचालक मुकुंद भोगले, आयसीडब्ल्यूएआयचे उपाध्यक्ष के. एल. जयसिंह, अध्यक्ष डी. व्ही. जोशी, माजी अध्यक्ष व्ही. व्ही. देवधर आदींची प्रमुख उपस्थिती होती. आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योगक्षेत्राचा आढावा घेऊन श्री. बागला म्हणाले, "उद्योगाच्या वाढीसाठी कामगार, व्यवस्थापन आणि कॉस्ट अकाऊंटंट यांच्यात समन्वय आणि शांतता आदी गुण असणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांपासून वाढत्या स्पर्धेमुळे दर्जात्मक उत्पादन करणे क्रमप्राप्त झाले आहे. केंद्राने कॉस्ट अकाऊंटट्सना अधिक स्वायत्तता दिली पाहिजे. आजचे युग मूल्याधारित कराचा (व्हॅल्यू ॲडेड टॅक्स) पुरस्कार करणारे युग आहे. आपल्याकडे ही संकल्पना व्यवस्थित समजावून घेतली पाहिजे. जपानमध्ये वस्तूच्या उत्पादनदर्जावर किंमत ठरविली जाते. तसे मापदंड आपल्याकडे लावले जावेत," अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

श्री. भोगले म्हणाले, "गेल्या दहा वर्षांत आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योगक्षेत्र झपाट्याने बदलले आहे. या बदललेल्या वातावरणात आपल्या उद्योगाचा टिकाव कसा लागेल, याचे नियोजन करण्याची प्राथमिक जबाबदारी कॉस्ट अकाऊंटट्सची आहे. बदलत्या वातावरणाने उद्योजकांची गरजही आपोआप बदलली आहे. १९३० ते आतापर्यंतचा आढावा घेतल्यास हा फरक लक्षात येईल. उत्पादन मूल्यावर आधारित किमती ठरविण्याची पद्धती योग्य आहे. त्यामुळे दर्जात्मक उत्पादन होत आहे. मूल्याधारित कर हा महत्त्वाचा मुद्दा आता मानला जाऊ लागला आहे. त्याबाबत विचार करणे क्रमप्राप्त आहे. विपणन विभाग आणि कॉस्ट अकाऊंटंट यांनी मिळून उत्पादनाचे मूल्य ठरविल्यास फायदेशीर ठरणार आहे. कारण कोणत्याही आव्हानाला तोंड देताना सकारात्मक दृष्टिकोन बाळगला पाहिजे," असे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी रमेश जोशी, श्री. मोदाणी, श्री. जयसिंह, डी. व्ही. जोशी आदींनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात कराबाबतच्या विविध शंकासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. अधिवेशनासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने कॉस्ट अकाऊंटंट आले आहेत. सूत्रसंचालन नितीन शर्मा यांनी केले. रमेश जोशी यांनी आभार मानले.




'आयसीडब्ल्यूएआय'च्या पश्चिम विभागीय अधिवेशनाचे उद्घाटन शुक्रवारी औरंगाबादेत आर. एन. बागला यांच्या हस्ते झाले. मुकुंद भोगले, डी. व्ही. जोशी, व्ही. व्ही. देवधर, रमेश जोशी, नितीन शर्मा आदी या वेळी उपस्थित होते.

# 'आयसीडब्ल्यूएआय'च्या अधिवेशनास प्रतिसाद

औरंगाबाद, ता. २७ : इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंटस् ऑफ इंडियाच्या (आयसीडब्ल्यूआय) औरंगाबाद शाखेच्या वतीने घेण्यात आलेल्या पश्चिम विभागीय अधिवेशनास मोठा प्रतिसाद मिळाला.

हॉटेल ताज रेसिडेन्सी येथे ता. २२ आणि २३ नोव्हेंबर रोजी हे अधिवेशन भरविण्यात आले होते. या अधिवेशनात 'अप्रत्यक्ष कर' या विषयावर देशभरातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. समारोप कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डी. व्ही. जोशी, औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष खडके आदींची प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवसांत या ठिकाणी मूल्याधारित कर, सेवा कर, केंद्रीय उत्पादन शुल्क आदींविषयी चर्चा करण्यात आली. रामानंद मोदाणी यांच्या मार्गदर्शनाखाली हे अधिवेशन भरविण्यात आले. त्यासाठी आर. बी. शुक्ला, ए. के. जोशी, आर. एच. झंवर, श्री. पंडित, एस. बी. खडके, आर. पी. गद्रे, एन. आर. शर्मा, जी. आर. कुलकर्णी, पी. के. अग्रवाल आदींनी पुढाकार घेतला.



'आयसीडब्ल्यूएआय'चे पश्चिम विभागीय अधिवेशन नुकतेच औरंगाबादेत भरविण्यात आले होते. अधिवेशन भरविल्याबद्दल औरंगाबाद शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा पश्चिम विभागीय कार्यकारिणीच्या वतीने सत्कार करण्यात आला.